3) सामाजिक समावेशन / सामाजिक क्षेत्र पुढाकार -

सामाजिक - आर्थिकदृष्ट्या वंचित गटांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आण्यासाठी केलेले प्रयत्न.

(1) दारिद्र्य निर्मूलन (2) रोजगार निर्मिती (3) सामा. सुरक्षा योजना (4) पेयजल (5) स्वच्छता (6) गृहनिर्माण (7) शिक्षण (8) आरोग्य (9) महिला व बालविकास

# घटक - भारतीय व्यापारी बँक व्यवसाय

## भारतीय वित्तीय व्यवस्था :

⇒ वित्त म्हणजे कर्जाने दिला घेतला जाणारा पैसा.

⇒ वित्ताची गरज व्यक्ती, कुटुंबे, व्यापारी, व्यावसायिक, उद्योगपती, शेतकरी विविध घटकांना.

**विभाग - 4**

i) वित्तीय बाजार
ii) वित्तीय संस्था
iii) वित्तीय सेवा
iv) वित्तीय साधने.

* वित्तीय बाजार - वित्ताच्या देवाणघेवाणीचा बाजार.

कालावधीनुसार - दोन भाग : अ) नाणे बाजार → अल्पकालीन वित्त ब) भांडवल बाजार → मध्यमकालीन व दीर्घकालीन

या दोन्ही बाजाराचे विभाजन अ) प्राथमिक बाजार → प्रथम निर्माण होणारी पत साधने - ब) द्वितीय बाजार → विद्यमान पत साधनांची देवाणघेवाण.

भारतीय वित्तीय बाजार

- भारतीय नाणे बाजार
  - असंघटित क्षेत्र
    - सावकार
    - सराफी पेढीवाले
  - संघटित क्षेत्र
    - व्यापारी बँक व्यवसाय.
- भारतीय भांडवल बाजार
  - व्यापारी बँका
  - विकास वित्तीय संस्था
  - विमा कंपन्या
  - मर्चंट बँका
  - म्युच्युअल फंड्स

४) वित्तीय संस्था : वित्तिय बाजारात विविध प्रकारच्या वित्तीय संस्था कार्य करतात. उदा. नाणेबाजारात व्यापारी बँका, सरकार, गैर बँकिंग वित्तिय कंपन्या तसेच RBI इ.
भांडवल बाजारात व्यापारी बँका, गुंतवणूक बँका, विमा कंपन्या, म्युच्युअल बँका इ.

५) वित्तीय सेवा : संस्था विविध प्रकारच्या वित्तीय सेवा उपलब्ध करून देतात.
उदा. कर्जपुरवठा, विमा इ.

६) वित्तीय साधने : संस्था आपल्या सेवा विविध प्रकारच्या वित्तीय पत्रसाधनांच्या साह्याने निर्माण करून देतात.
नाणेबाजार - नोटीस कर्जे / ट्रेझरी बिले / मुदती कर्जे / सर्टिफिकेट्स डिपॉझिट्स
भांडवलबाजार : * इक्विटी विभाग → शेअर्स समावेश
* डेट विभाग → डिबेंचर्स, बॉन्ड्स

## वित्तिय बाजार (Indian Financial Markets)

**भारतीय नाणे बाजार :** अल्पकालीन निधीची देवाणघेवाण त्याला नाणे बाजार म्हणतात.
- कर्ज १ वर्षाच्या कालावधीसाठी - (अपवाद : कृषीसाठी १५ ते १८ महिने)
- असंघटित तसेच संघटीत क्षेत्राचा समावेश


**भारतीय भांडवल बाजार** - दीर्घकालीन निधींची देवाणघेवाण
- १ वर्षापेक्षा अधिक कालावधीचे कर्ज - ५ वर्षांचे मध्यमकालीन २०-२५ वर्षे दिर्घकालिन
- व्यापारी बँका ⇒
- विकास वित्तिय संस्था : IFCI, IDBI, ICCI, SFCs, SIDCs इ.
- विमा कंपन्या - LIC व GIC
- मर्चंट बँका -
- म्युच्युअल फंड्स - UTI - Unit Trust of India
- पतदर्जा ठरविणाऱ्या संस्था. CRISIL, CARE, ICRA.

भांडवल बाजारात कर्ज घेणाऱ्यांना ऋणको तर कर्ज देणाऱ्यांना धनको म्हणतात.

IFCI - Industrial Finance Corporation of India
IDBI - Industrial Development Bank of India
SFCs - State Financial Corporation
SIDC - State Industrial Developmen Corporation.
ICRA - Indian ~~Independant~~ Information & Credit Rating Agency.

Scanned by CamScanner

## भारतीय बँक व्यवसायाची रचना :




## भारतीय बँक व्यवसायाची उत्क्रांती व प्रगती :

1) १७७० ⇒ अॅलेक्झांडर अँड कंपनीने कलकत्त्याला 'बँक ऑफ हिंदुस्थान' - पहिली भारतीय
सुमारे २० वर्षे काम - नंतर बंद.

2) १९ व्या शतकाच्या सुरुवातीला ईस्ट इंडिया कंपनीने प्रेसिडेन्सी बँका (इलाखा बँका) स्थापन करण्याचा
निर्णय घेतला :

१८०६ ⇒ पहिली प्रेसिडेन्सी बँक - बँक ऑफ कलकत्ता -
१८०९ मध्ये सनद प्राप्त - रुपांतर प्रेसिडेन्सी बँक ऑफ बेंगाल.
मर्यादित जबाबदारीच्या तत्त्वावर - पहिली संयुक्त भांडवली कंपनी.
१८२३ - नोट छापण्याचा अधिकार
१८३९ - शाखा उघडण्याची अनुमती.

१८४० ⇒ दुसरी प्रेसिडेन्सी बँक 'बँक ऑफ बॉम्बे'
१८४३ ⇒ तिसरी -״- बँक ऑफ मद्रास.

या तिन्ही बँकांना नोट छापण्याचा अधिकार - परंतु नोट लोकप्रिय न झाल्याने
१८६२ मध्ये कागदी चलन प्रसृत करण्याचा मक्ता ब्रिटिश भारत सरकारने स्वा..

१८६५ - अलाहाबाद बँक, अलायन्स बँक ऑफ सिमला इ. स्थापना.

Scanned by CamScanner

१८८१ ⇒ 'अवध कमर्शियल बँक' - भारतीयांनी स्थापन केलेली पहिली बँक.

१८९४ ⇒ पंजाब नॅशनल बँक: लाला हरकिशन यांच्या प्रयत्नाने - संपूर्ण भारतीय मालकीची पहिली बँक.

१९०६-१९१३ ⇒ ९८ बँका स्थापन पैकी १९१३-१७ काळात ८७ बँका बुडाल्या.

१९२१ ⇒ प्रेसिडेन्सीज बँका एकत्र करून इंपिरियल बँकेची स्थापना - एक खाजगी बँक मात्र ब्रिटिश सरकारसाठी काम.

१९३५ ⇒ भारताची मध्यवर्ती बँक म्हणून RBI ची स्थापना.

## स्वातंत्र्योत्तर प्रगती:

1) जानेवारी १९४९ रोजी RBI चे राष्ट्रीयीकरण
(RBI - सार्वजनिक मालकीकडे हस्तांतरण कायदा - १९४८)

2) बँकिंग विनिमय कायदा: १९४९. (Banking Regulation Act-1948)
- भारतात कर्जबुडीचे प्रमाण जास्त - बँकबुडीचे प्रमाण जास्त -
- बँकांवर नियंत्रण आणणारा हा कायदा. १६ मार्च १९४९ पासून लागू.

या कायद्यानुसार RBI ला पुढील अधिकार प्राप्त झाले.
i) बँकेची स्थापना करण्यासाठी तसेच शाखा काढण्यासाठी RBI ची संमती आवश्यक
ii) बँकांचे हिशेब तपासण्याचे अधिकार.
iii) कर्जवाटप व व्याजदर संदर्भात बँकांना सूचना देणे.

दि बँकिंग कंपनीज (अमेंडमेंट ॲक्ट), १९६१ नुसार RBI ला सरकारच्या संमतीने बँकांचे सक्तीने विलीनीकरण करण्याचा हक्क मिळाला.

3) १ जुलै १९५५ - . SBI कायदा: १९५५. अन्वये सरकारने इंपिरियल बँकेला ताब्यात घेऊन तिचे रुपांतर SBI मध्ये रुपांतर. - अखिल भारतीय ग्रामीण पतपाहणी समितीने आपल्या अहवालात शिफारस केली. अध्यक्ष - ए.डी. गोरवाला - अहवाल डिसें. १९५४
कारण ⇒ कृषी व ग्रामीण विकासासाठी योग्य प्रमाणात वित्तपुरवठा व्हावा यासाठी ग्रामीण भागात बँकिंग सुविधांचा विस्तार व्हावा.
SBI कायदा १९५५ अंतर्गत इंपिरियल बँकांच्या प्रचलित भांडवलापैकी ९२.१% भांडवल RBI ला. तर उरलेले खाजगी व्यक्ती/संस्थाकडे.

4) १९५९: सरकारने 'SBI - संलग्न कायदा १९५९ संमत केला. त्यानुसार ८ संस्थानिकांच्या बँका SBI ने ताब्यात घेतल्या - त्यांना SBI च्या सहयोगी बँका म्हणून ओळखले.

5) १९६३ - यापैकी बँक ऑफ बिकानेर व बँक ऑफ जयपूर - यांचे विलीनीकरण होवून स्टेट बँक ऑफ बिकानेर ॲन्ड जयपूर स्थापन झाली - व संख्या ७ झाली.
१३ ऑ. २००८ पासून स्टेट बँक ऑफ सौराष्ट्रचे } SBI मध्ये विलीनीकरण.
२६ ऑ. २०१० पासून स्टेट बँक ऑफ इंदोरचे }
ऑगस्ट २०१६ पासून सर्व सहयोगी बँकांचे - ---||---

Scanned by CamScanner

विलिनीकरणानंतर SBI च्या सुमारे २२५५० शाखा. - ५० कोटी ग्राहक.

सहयोगी बँका:
① स्टेट बँक ऑफ जयपूर
② स्टेट बँक ऑफ बिकानेर ] स्टेट बँक ऑफ जयपूर अँड बिकानेर
③ स्टेट बँक ऑफ सौराष्ट्र
④ स्टेट बँक ऑफ इंदौर ] SBI मध्ये
⑤ स्टेट बँक ऑफ पटियाळा
⑥ स्टेट बँक ऑफ हैद्राबाद
⑦ स्टेट बँक ऑफ म्हैसूर
⑧ स्टेट बँक ऑफ त्रावणकोर

६) १ फेब्रुवारी १९६९ - व्यापारी बँकांवर सामाजिक नियंत्रण लादण्यात आले. त्याबाबचा नि तत्कालीन उपपंतप्रधान व अर्थमंत्री श्री मोरारजी देसाई यांनी घेतला.
१९ जुलै १९६९ - १४ खाजगी बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. (ज्यांच्या ठेवी जून १९६९ मध्ये ५० कोटीपेक्षा अधिक होत्या.)

<u>राष्ट्रीयीकरण</u> - एखाद्या खाजगी व्यक्तीने/संस्थेने संघटित केलेला आणि ज्या मालकी व व्यवस्थापनही अशा व्यक्ती/संस्थे कडून केले जाते असा जेव्हा शासन आपल्या ताब्यात घेते तेव्हा त्या व्यवसायाचे राष्ट्रीयीकरण झाले असे म्हणतात. त्याची कारणे (बँकांच्या)

१) आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण दूर करण्यासाठी
२) अग्रक्रम क्षेत्राला कर्जपुरवठा - उदा, कृषी, लघुउद्योग, ग्रामीण
३) ग्रामीण भागात बँकांचा शाखा विस्तार
४) प्रादेशिक समतोल साधणे.

८) १५ एप्रिल १९८० - ६ बँकांचे राष्ट्रीयीकरण : ज्यांच्या ठेवी १४ मार्च १९८० रोजी रु २०० को

९) ४ सप्टें. १९९३ - तोट्यात चाललेल्या न्यू बँक ऑफ इंडियाचे विलीनीकरण पंजाब नॅशनल बँकेत.

९) १९९३ - जाने मध्ये RBI ने खाजगी क्षेत्रात नवीन बँका स्थापन करण्याची संमती. त्यांना नवीन खाजगी बँका म्हणून ओळखू लागले.

१०) १९९४ - सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या 'आंशिक खाजगीकरणाचे धोरण जाहीर' त्यानुसार बँकांना स्वतःचे भांडवल विकून नवीन भांडवल उभारणी करण्यास संमती देण्यात आली. मात्र या बँकांमधील भारत सरकारच्या मालकीचे प्रमाण ५१% कमी होणार नाही ही अट. तसेच बँकांमध्ये परकीय प्रत्यक्ष गुंतवणूकीस संमती खाजगी बँकांमध्ये ७४% परकीय प्रत्यक्ष गुंतवणूकीस संमती.

Scanned by CamScanner

SBI च्या मालकीचे हस्तांतरण :

१९५५ - RBI चा हिस्सा ६२.१%

जून २००८ - RBI चा हिस्सा ५९.७३

जून २००८ - RBI ” ००% (३५,५३१) कोटींना सरकारला विकली)

नरसिंहम समिती II (१९९८-९९) च्या शिफारशींने कारण RBI बँकिंग क्षेत्राची नियामक असल्याने तिने बँकांचे मालक असू नये.

* भारतातील पहिली बँक : बँक ऑफ हिंदुस्थान - १७७०
* भारतीयांनी स्थापन केलेली पहिली बँक : अवध कमर्शियल बँक १८८१
* पहिली पूर्ण भारतीय बँक - पंजाब नॅशनल बँक - १८९४
* भारतातील सर्वात मोठी बँक - SBI
* भारतातील सर्वात मोठी खाजगी बँक - ICICI
* भारतातील सर्वात मोठा बँक समूह - राष्ट्रीयीकृत
* भारतातील सर्वाधिक शाखा असलेली परकीय बँक - स्टॅंडर्ड अँड चार्टर्ड - यु.के
* परदेशात सर्वाधिक शाखा असलेली भारतीय बँक - SBI
* परदेशात सर्वाधिक देशांमध्ये काम करणारी भारतीय बँक SBI
* जगातील सर्वात मोठी बँक - इंडस्ट्रियल कमर्शिअल बँक ऑफ चायना.
* भारतात चेकची व्यवस्था सुरू करणारी पहिली बँक : बेंगॉल बँक १७८४
* भारतात बचत बँक सुरू करणारी पहिली बँक - प्रेसिडेन्सी बँक ऑफ बेंगॉल १८३०
* इंटरनेट बँकिंग सुरू करणारी पहिली बँक - ICICI बँक
* क्रेडीट कार्ड सुरू करणारी पहिली बँक - सेंट्रल बँक ऑफ इंडिया.
* एटीएम ——"—— - HSBC Bank - 1987
* ISO प्रमाणपत्र मिळालेली पहिली बँक - कॅनरा बँक
* म्युच्युअल फंड सुरू करणारी पहिली बँक - SBI
* सर्वात जुनी सार्वजनिक क्षेत्रातील बँक - अलाहाबाद बँक
* भारताबाहेर शाखा काढणारी पहिली बँक - BOI - 1946 - लंडन.

## * बँक व बँक व्यवसायाची व्याख्या :*

⇒ बँकिंग विनिमय कायदा - 1949 नुसार

बँक व्यवसाय म्हणजे मागणी करताक्षणी परत करण्याच्या अटीवर स्वीकारलेल्या ठेवीतून ग्राहकांना धनादेश, ड्राफ्ट्स, ऑर्डर वा अन्य मार्गाने पैसे काढण्याची परवानगी देणे व ठेवीचा पैसा कर्जाने देण्यासाठी किंवा गुंतवणूक करण्यासाठी वापरणे होय.

Scanned by CamScanner

व्यापारी बँकांची कार्ये : i) व्यापारी बँक लोकांकडून ठेवी स्विकारते } बँकेची भूमिका
ii) ठेवीतून गरजू लोकांना कर्जे देते. } धनकोची.

प्राथमिक / मुलभूत कार्ये :
यामध्ये ठेवी स्विकारणे, कर्जे देणे, आणि पतचलन निर्मिती करणे यांचा

**i) ठेवी स्विकारणे**

बँका जनतेकडून विविध खात्यांवर ठेवी स्विकारतात → चालू खाते, बचत खाते, आवर्ती, मुदत ठेवीचे खाते.

⇒ चालू व बचत खात्यावरील ठेवी ठेवीदारांनी मागताक्षणीच बँकेने परत करणे कारणेचे असल्याने त्यांना **मागणी ठेवी** असेही म्हणतात.

⇒ मुदत ठेवी व आवर्ती ठेवी ठराविक मुदतीनंतरच द्यावयाच्या असल्याने त्यांना **मुदत ठेवी** म्हणतात.

⇒ बँकाकडे जमा झालेले पैसे ठेवीदाराचे असल्याने त्यांना मुदत ठेवी बँकेच्या दृष्टीने देयता असते - या ठेवीवर बँकांना व्याज द्यावे लागते. त्या दरास ठेवी व्याजदर

⇒ बँकाकडे जमा झालेल्या एकूण ठेवींना एकूण मागणी व मुदत देयता म्हणतात.

**ii) कर्जे व आग्रिमे देणे** (Loans & Advances)

⇒ कर्जे व आग्रिमे ठेवीतून दिली जातात. त्यावर व्याज आकारतात व नफा मिळवतात.

⇒ प्रमुख आग्रिमे पुढीलप्रमाणे.
1) रोख पत / रोख कर्जे (Cash Credit)
2) अधिकर्ष सवलत (Overdraft)
3) तारणमुल्याधारित कर्ज (Loans)
4) हुंड्यांची वटवणी (Discounting of Bills)

⇒ बँकेने जनतेला दिलेली कर्जे बँकेच्या दृष्टीने मालमत्ता असते कारण कर्जे व्याजासह परत येणार असतात.

⇒ कर्जावरील व्याजदराला 'कर्ज व्याज दर' असे म्हणतात. हा व्याज दर ठेवींवरील व्याज दरापेक्षा अधिक असतो - दोघांमधील फरकास Spread असे म्हणतात. - हा Spread म्हणजेच बँकेचा नफा.

- हा कर्जव्याजदर पुढील बाबींवर ठरतो - ① कर्जाचा प्रकार
② कर्जाचा कालावधी.

जुलै २०१० पासून बँकांवर व्याज दराच्या बाबतीत 'Base Rate' चे बंधन टाकण्यात आले.
- Base Rate - हा किमान व्याज दर असतो ज्यापेक्षा कमी दराने बँक कर्जे देऊ शकत नाही. प्रत्येक बँकेने हा दर स्वमर्जीने ठरवायचा असतो व खुलेपणाने जाहीर करायचा.

Scanned by CamScanner

असतो. पूर्वी या दराला Bench Mark Prime Lending Rate - म्हणले जात असे.

⇒ बँकांच्या कर्जाचे वर्गीकरण चार गटात: ① प्रमाणित मालमत्ता (Standard Asset)
② निमप्रमाणित मालमत्ता (Sub-Standard Asset)
③ संदिग्ध मालमत्ता (DoubtFull Asset)
④ बुडीत मालमत्ता (loss Asset)

प्रमाणित मालमत्तेला बँकेचे Performing Asset तर
उपप्रमाणित + संदिग्ध + बुडीत मालमत्तांना Non-Performing Asset - NPA म्हणतात.

## 1) पतनिर्मिती करणे

ठेवी स्विकारणे व कर्जे देणे या प्रक्रियां दरम्यान पतपैसा निर्माण करतात.
कर्जखात्यांच्या माध्यमातून पतपैसा निर्माण होतो. पतपैसा लोकांच्या हातातील क्रयशक्ती (Purchasing Power) वाढवितो. याबाबत पतनियंत्रण RBI चे असते.

## दुय्यम / अनुषंगिक कार्ये:

वर्गीकरण: प्रातिनिधीक कार्ये व सर्वसाधारण सेवा कार्ये.
प्रातिनिधीक: ग्राहकांच्या सुचनेनुसार केली जाणारी.
सर्वसाधारण: ग्राहक व ग्राहकेतर व्यक्तींसाठी केली जाणारी.
उदा. ग्राहकांसाठी पैशाची पाठवणी, ग्राहकांसाठी विश्वस्त, मृत्यूपत्र व्यवस्थापक इ.

## * अनुसुचित व बिगर अनुसुचित बँका *

RBI कायदा 1934 च्या कायद्यान्वये व्यापारी बँकांचे वर्गीकरण.

अ) अनुसुचित बँका ⇒ (Schedwled Banks)

RBI कायदा 1934 च्या दुसऱ्या अनुसुचीत समावेश - त्यासाठी खालील निकष
① भाग भांडवल व राखीव निधी - 5 लाख रु पेक्षा कमी नसावा.
किमान भांडवल मर्यादा: 1993 - 100 कोटी
2001 - 200 कोटी
2015 - 500 कोटी.

RBI कडून सुविधा:
i) अशा बँकातील खात्यांना सुरक्षितता व पतमुल्य प्राप्त होते.
ii) RBI कडून बँक दराने कर्ज मिळण्यास पात्र
iii) RBI कडून पुनर्वित्ताच्या सोयीस पात्र.
iv) निरसन गृहांचे (Clearing House) चे सदस्यत्व मिळते.

Scanned by CamScanner

RBI-ची बंधने: i) CRR व SLR चे बंधन.
ii) प्रत्येक शुक्रवारी आठवड्याचा अहवाल RBI कडे पाठवावा.
iii) RBI च्या निर्देशांचे पालन - बंधनकारक

अनुसूचित बँकामध्ये पुढील बँकांचा समावेश:
i) SBI
ii) राष्ट्रीयीकृत बँका
iii) प्रादेशिक ग्रामीण बँका
iv) भारतीय खाजगी अनुसूचित बँका
v) परकीय बँका
vi) राज्य सहकारी बँका.

ब) गैरअनुसूचित बँका: ज्यांचा RBI ॲक्ट 1934 च्या दुसऱ्या अनुसूचित समावेश नाही
→ या बँकांना RBI च्या कर्जे, पुनर्वित्त, विनिमय पत्रांची पुनर्वटणी इ सोयी
→ मात्र काही RBI-ची बंधने: CRR चे बंधन (मात्र CRR-चा निधी RBI ठेवण्याऐवजी स्वत:कडे ठेवण्याची संमती)

पुढील बँकांचा समावेश:
i) भारतातील खाजगी गैर-अनुसूचित बँका.
ii) जिल्हा मध्य. सह. बँका.
iii) प्राथमिक सह. पतसंस्था.

## * भारतातील बँका *

मालकीच्या आधारावर: ① सार्वजनिक क्षेत्रातील ② खाजगी क्षेत्रातील.

① सार्वजनिक क्षेत्रातील:

सरकारची बहुमताची मालकी असलेल्या (किमान 51%)
i) SBI ①
ii) 19 राष्ट्रीयीकृत बँका ⑲
iii) प्रादेशिक ग्रामीण बँका (RRBs)
iv) इतर सार्वजनिक बँक - यामध्ये IDBI Ltd या बँकेचा समावेश.
2004 मध्ये IDBI Bank या व्यापारी बँकेचे IDBI या विकास बँकेत व त्यातून IDBI Bank Ltd. सध्या 21 वी (RRB वगळता)

② खाजगी क्षेत्रातील बँका.

① भारतीय खाजगी बँका ② परकीय खाजगी बँका.

भारतीय खाजगी बँका - सध्या देशात 26 भारतीय खाजगी बँका - तीन प्रकार.

अ) जुन्या खाजगी बँका: 1969 पूर्वीच्या स्थापन झालेल्या खाजगी बँका.
1969 पासून खाजगी बँक स्थापनेस परवानगी बंद.

भारतात स्थापन झालेली पहिली खाजगी बँक - 1899 - नेदनगडी बँक - कोझिकोडे

१९६९ पूर्वीच्या खाजगी बँका:

① सिटी युनियन बँक - 1904
② करूर व्यास बँक - 1916
③ कॅथलिक सिरियन बँक - 1920
④ ता.नाडू मर्कंटाईल बँक - 1921
⑤ नैनिताल बँक 1922
⑥ कर्नाटक बँक 1924
⑦ लक्ष्मी विलास बँक 1926
⑧ धनलक्ष्मी बँक 1927
⑨ साऊथ इंडियन बँक 1929
⑩ फेडरल बँक 1931
⑪ जम्मू व काश्मिर बँक 1938
⑫ RBL बँक (रत्नाकर बँक) 1943

नवीन खाजगी बँका:

नरसिंह्म समितीच्या शिफारशीनुसार १९९३ खाजगी क्षेत्रात बँक स्थापन करण्यास परवानगी. सुरुवातीला १० नव्या खाजगी बँकांची स्थापना - भागभांडवल 200कोटी मर्यादा.

UTI बँक अहमदाबाद ही पहिली. (पहिली शाखा - 2 एप्रिल 1994)

जुलै 30, 2007 - नाव Axis Bank.

खाजगी बँका:

① DCB Bank- 1930 — 1995 साली शेड्युल्ड बँकेचा दर्जा.
② ICICI बँक 1994 —
③ Axis बँक 1993
④ HDFC बँक 1994
⑤ इंडसइंड बँक 1994
⑥ कोटक महिंद्रा 2001
⑦ येस बँक 2004
⑧ IDFC बँक 2015
⑨ बंधन बँक 2015
⑩ उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक - 2017

स्थानिक क्षेत्रिय बँका

१९९६-९७ च्या बजेटमध्ये भारत सरकारने खाजगी क्षेत्रात 'स्थानिक क्षेत्रिय बँका' स्थापन करण्याचे जाहीर केले. (Local Area Banks)

ग्रामीण भागातील बचती गोळा करून त्याचा वापर स्थानिक भागातच कर्जरूपाने व्हावा हा उद्देश.

मार्गदर्शक तत्वे:
i) बँकाचे कार्यक्षेत्र तीन सलग जिल्ह्यांचा प्रदेश.
ii) भाग भांडवल - 5 कोटी
iii) 3 जिल्ह्याच्या कार्यक्षेत्राबाहेर शाखा काढता येणार नाही.

Scanned by CamScanner

या बँकांच्या कामकाजाच्या सर्वेक्षणासाठी - RBI ने जी.रामचंद्रन यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई मध्ये अभ्यासगट.

सध्या चार स्थानिक क्षेत्रीय बँका कार्यरत.

→ सध्या चालू स्थानिक क्षेत्रीय बँक - 27 डिसें 1999

① कोस्टल स्थानिक क्षेत्रिय बँक
मुख्यालय : विजयवाडा (आंध्र)
कृष्णा, गुंटूर व प. गोदावरी जिल्हा

② कॅपिटल स्थानिक क्षेत्रिय बँक - 14 जाने 2000
मुख्यालय - फगवाडा (पंजाब)
जालंदर, कपुरथळ, होशीयारपूर

③ कृष्णा/भीमा समृद्धी स्थानिक क्षेत्रिय बँक - 28 feb-2001
मुख्यालय - महबूब नगर (आंध्र)
महबूबनगर (आंध्र)
रायचूर व गुलबर्गा (कर्ना)

④ सुभद्रा ~~लोकल~~ स्थानिक क्षेत्रिय बँक :- सप्टें 2003
मुख्यालय - कोल्हापूर
कोल्हापूर, सांगली
बेळगाव.

## परकीय व्यापारी बँका.

→ भारतात ब्रिटिश कालावधी पासून परकीय बँका कार्यरत.

→ 1993 च्या नवीन धोरणानुसार परकीय बँकेला भारतात पहिली शाखा काढण्यास किमान 1 कोटी डॉलर्स भारतात आणावे लागतात.

दुसऱ्या शाखेसाठी 1 कोटी डॉलर्स तर तिसऱ्या साठी 0.5 कोटी डॉलर्स.

जाने 2017 मध्ये 25 देश - 46 परकीय बँका - 325 शाखा.

स्टॅण्डर्ड चार्टर्ड - इंग्लंडच्या सर्वाधिक शाखा - 102

एच.एस.बी.सी 50

सिटी बँक 45

## * परदेशात कार्य करणाऱ्या भारतीय बँका :*

जाने 2017- 15 भारतीय बँका (12-सार्वजनिक व 3 खाजगी क्षेत्रातील) - 304

एकूण 304 परकीय कार्यालये. त्यामध्ये 183 शाखा
6 संयुक्त उद्योग
26 संलग्न संस्था
56 प्रातिनिधीक कार्यालये
32 इतर कार्यालये

परदेशात सर्वाधिक शाखा - SBI - 52
BOB - 59

— सर्वाधिक कार्यालये SBI - 55
BOB - 63

Scanned by CamScanner

- परदेशात सर्वाधिक देशांत बँक व्यवसाय - SBI - ३१ देश
BOB - २५ देश

परदेशात सर्वाधिक शाखा - यूके - ३०
हाँगकाँग - १९
सिंगापूर - १७

## * भारतीय महिला बँक *

२०१३-१४ च्या अर्थसंकल्पात - भारतीय महिला बँक स्थापण्याचे निर्देश.
२५ सप्टें २०१३ - भारतीय महिला बँकेला बँकेचा परवाणा.
सुरुवातीचे भांडवल १००० कोटी रु. - मुख्यालय - नवी दिल्ली.
संपूर्ण भारत सरकारच्या मालकीची बँक
घोषवाक्य - 'Empowering Women, Empowering India'
पहिली शाखा: १९ नोव्हें २०१३ - नरिमन पॉईंट येथील एयर इंडियाच्या इमारतीत.
बँकेचे कर्मचारी, ठेवीदार, तसेच कर्जदार — महिला तसेच पुरुषही असतील - मात्र मुख्यत्वे महिला.
किमान २५% शाखा बँकाविरहीत ग्रामीण भागात (१०,००० पेक्षा कमी लोकसंख्या)
खास महिलांसाठी वेगळी बँक असलेला पाकिस्तान व टांझानियानंतरचा तिसरा देश
ऑगस्ट २०१६मध्ये SBI मध्ये विलिनीकरण.

## * अग्रणी बँक योजना *

शिफारस: धनंजयराव गाडगीळ अध्यक्ष → राष्ट्रीय पत समिती अभ्यास गटाने.
⇒ १९६९ च्या अहवालात राष्ट्रीयीकृत बँकांना क्षेत्रीय दृष्टीकोन लागू करण्याची शिफारस केली.
⇒ या प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी १९६९ मध्ये एफ. के. नरीमन यांच्या अध्यक्षतेखाली बँक व्यावसायिकांची समिती स्थापन करण्यात आली. या समितीने गाडगीळ यांचा 'क्षेत्रिय सेवा दृष्टीकोन' मान्य करुन त्याला मूर्त स्वरुप दिले.
सुरुवात: डिसें १९६९ मध्ये RBI ने योजना स्विकारली व तिची अंमलबजावणी देश-३३८ जिल्हे
: ३३८ जिल्हे SBI-तिच्या सहयोगी बँका, १४ राष्ट्रीयीकृत बँका व ३ खाजगी बँकांमध्ये वाटून देण्यात आले.
⇒ एक जिल्हा एका बँकेला दत्तक म्हणून देण्यात आला.
कार्ये ⇒ i) जिल्ह्याचे सर्वेक्षण करुन जिल्ह्याची पत गरज ठरविणे.
ii) बँक शाखा कोठे सुरु करता येईल याचा शोध घेणे.
iii) जिल्हा सल्लामसलत समित्या:- समन्वयाचे कार्य:
a) सर्व व्यापारी बँका, सहकारी बँका, अन्य वित्तीय संस्थांमध्ये समन्वय.
b) जिल्हा प्रशासन व जिल्ह्यातील बँकांमध्ये समन्वय.

Scanned by CamScanner

c) अल्पकालीन व दीर्घकालीन कर्ज पुरवठ्यामध्ये समन्वय :

iv) १९७८ च्या उच्चाधिकार समितीच्या शिफारशीनुसार अग्रणी बँकांवर ३ वर्षाची जिल्हा पतयोजना तयार करण्याची जबाबदारी.

v) एप्रिल १९८९ मध्ये अग्रणी बँक योजनेअंतर्गत 'सेवा क्षेत्र दृष्टिकोन' लागू करण्यात आला.

सद्यस्थिती : जाने २०१८ - मध्ये देशातील ७०१ जिल्ह्यामध्ये कार्यरत.
१५० जिल्ह्यामध्ये SBI - अग्रणी बँक म्हणून.

महाराष्ट्रातील अग्रणी बँका -
SBI ⇒ बीड, नांदेड, उस्मानाबाद, लातूर, परभणी, हिंगोली, वाशिम, नंदुरबार
सेंट्रल बँक ऑफ इंडिया ⇒ अकोला, अमरावती, धुळे, जळगाव, यवतमाळ, नगर, बुलढाणा
BOI ⇒ नागपूर, भंडारा, चंद्रपूर, रायगड, रत्नागिरी, सोलापूर, सांगली, कोल्हापूर, सिंधुदुर्ग, गडचिरोली, गोंदिया, मुंबई, मुंबई उपनगर
Bank of Maharashtra - औरंगाबाद, नाशिक, पुणे, सातारा, ठाणे, पालघर, जालना

⇒ बँक ऑफ महाराष्ट्र - अग्रणी बँकांची नियंत्रक बँक म्हणून महाराष्ट्रात कार्य करते.

उषा थोरात समिती : २००९ मध्ये अग्रणी बँक योजनेचे परिक्षण श्रीम उषा थोरात यांच्या अध्यक्षतेखाली - समितीने केले.
योजनेच्या बळकटीकरणासाठी शिफारशी.

* मे २०१३ पासून अग्रणी बँक योजना शहरी भागासाठी लागू.

## * अग्रक्रम / प्राधान्य क्षेत्र कर्ज पुरवठा *

अग्रक्रम क्षेत्र म्हणजे अशी क्षेत्रे ज्यांना वेळेवर व योग्य प्रमाणात कर्ज मिळविणे अवघड जाते. ही कर्जे छोटी कर्जे असतात.

प्रमुख टप्पे
① बँकांचे राष्ट्रीयीकरण
② १९७२ मध्ये अग्रक्रम क्षेत्राचे औपचारिक वर्णन.
- कृषी व लघुउद्योग यांना अग्रक्रम क्षेत्राचा दर्जा देण्यात आला.
- मार्च १९७९ पर्यंत आपल्या एकूण कर्जाच्या ३३.३% कर्ज अग्रक्रम क्षेत्राला देण्याचा सल्ला.
③ १९८० - मध्ये डॉ. के. एस. कृष्णस्वामी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेला '२० कलमी आर्थिक कार्यक्रम' ने शिफारस → सर्व व्यापारी बँकांनी १९८५ पर्यंत अग्रक्रम क्षेत्राला कर्जपुरवठ्याचे ४०% लक्ष्य पूर्ण करणे बंधनकारक
④ अलिकडे २००७ मध्ये सी. एस. मूर्ती - यांच्या शिफारशी.

v) एम.व्ही नायर समिती २०११. - अग्रक्रम क्षेत्राच्या वर्गीकरणाचे पुनपरिक्षण करण्यासाठी एक समिती. ऑगस्ट २०११ ⟹ अहवाल फेब्रु २०१२

परकीय बँकांचे दोन गट -१) २०पेक्षा अधिक शाखा २) २०पेक्षा कमी शाखा पैकी २० पेक्षा अधिक असलेल्या परकीय बँकावर भारतीय व्यापारी बँकाप्रमाणेच लक्ष्य.

vi) अग्रक्रम क्षेत्रांतर्गत विविध गट : २३ एप्रिल २०१५ पासून

① कृषी
② सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम
③ शिक्षण
④ गृहनिर्माण
⑤ निर्यात कर्जे
⑥ सामाजिक पायाभूत संरचना
⑦ पुनर्निर्मितीक्षम ऊर्जा

(⑥, ⑦ → २०१५ मध्ये नव्याने समाविष्ट)

अग्रक्रम क्षेत्र कर्जपुरवठ्याची लक्ष्ये व उपलक्ष्ये :

अ) भारतातील व्यापारी बँका: २० व त्यापेक्षा अधिक शाखा असलेल्या परकीय बँकासाठी :

① एकूण अग्रक्रम क्षेत्र: - ४०% कर्जपुरवठा अग्रक्रम क्षेत्रासाठी - बंधनकारक
परकीय बँकासाठी मुदत मार्च २०१८ पर्यंत.

② एकूण कृषी कर्ज पुरवठा - एकूण कर्जपुरवठ्या पैकी १८% कृषी क्षेत्रास तर त्यापैकी ८% सिमांत व लघु शेतकऱ्यांना.
परकीय बँकासाठी -१८% लक्ष्य - मार्च २०१८ पर्यंत साध्य - ८% उपलक्ष्य मार्च २०१८ नंतर.

③ दुर्बल घटक - एकूण कर्जपुरवठ्या पैकी १०% - दुर्बल घटकांना.
परकीय बँक - मार्च २०१८ पर्यंत. दुर्बल घटकांत पुढील घटकांचा समावेश

① लघु व सीमांत शेतकरी, भूमिहीन शेतकरी, शेतमजूर
② ग्रामीण कारागीर व ग्राम व कुटीर उद्योग
③ अनु.जाती व अनु. जमाती
④ NRLM व NULM व सफाई कामगार पुनर्वसन योजनेअंतर्गत लाभार्थी
⑤ कर्जबाजारी झालेले शेतकरी (गैरसंस्थात्मक कर्ज)
⑥ स्वयं सहायता गटांना दिलेली कर्जे
⑦ वैयक्तिक महिला लाभार्थींची एक लाख रु.पर्यंतची कर्जे
⑧ अपंग व्यक्ती
⑨ जनधन योजनेअंतर्गत ओव्हरड्राफ्ट कर्जे
⑩ अल्पसंख्यांक समुदाय

④ सुक्ष्म उपक्रम : एकूण कर्जपुरवठ्याच्या ७.५% पुरवठा सुक्ष्म उपक्रमांना.
परकीय बँक - मार्च २०१८

Scanned by CamScanner

ब) २० पेक्षा कमी शाखा असलेल्या परकीय बँकांसाठी लक्ष्ये.
२० पेक्षा कमी शाखा असलेल्या परकीय बँकांसाठी लक्ष्ये - अग्रक्रम क्षेत्रास - लक्ष्य मार्च २०२० एकूण कर्जपुरवठ्यापैकी ४०% कर्जपुरवठा - अग्रक्रम क्षेत्रास
अशा बँकावर कृषी, सूक्ष्म व लघु उपक्रम, निर्यात कर्ज व दुर्बल घटक यांना द्यावयाच्या कर्जासाठी उपलक्ष्ये लागू नाहीत. मात्र त्यांना दिलेल्या कर्जाची गणना अग्रक्रम क्षेत्रामध्ये केली जाते.

→ ग्रामीण पायाभूत सुविधा विकास निधी :- (Rural Infrastructure Development Fund)
भारत सरकारने १९९५-९६ च्या बजेटमध्ये नाबार्ड अंतर्गत हा निधी पहिल्यांदा निर्माण केला.
→ अग्रक्रम क्षेत्रातील कृषी कर्जपुरवठ्याची लक्ष्ये पूर्ण न करणाऱ्या व्यापारी बँकांना कर्जपुरवठ्यातील फरकाएवढे पैसे या निधीमध्ये ठेवावे लागतात. नाबार्ड या ठेवीवर बँकांना बँक दरापेक्षा २ ते ३ टक्क्यांनी व्याज देते.
→ हा निधी ग्रामीण पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी ७ वर्षांच्या कालावधीसाठी दिला जातो.

→ प्रादेशिक ग्रामीण बँका : (Regional Rural Banks)

प्रादेशिक बँकांचा उगम :
1) कृषी पतपुरवठ्याचा बहु-संस्थात्मक दृष्टीकोन - अधिक बँकांची गरज
2) २० कलमी कार्यक्रम १९७५ - कर्जबाजारीपणा संपवून टाकणे.
3) एम. नरसिंहम कार्यगट :- १ जुलै १९७५ रोजी - ग्रामीण बँक विषयक कार्यगट स्थापन करण्यात आला. त्यांच्या शिफारशीनुसार
२६ सप्टें १९७५ - प्रादेशिक ग्रामीण बँका अध्यादेश १९७५ जारी
९ फेब्रु १९७६ - प्रादेशिक ग्रामीण बँका कायदा १९७६.
१९७८ - दांतवाला समितीने RRB's ची उद्दिष्ट्ये १९७८ - स्पष्ट

स्थापना : २ ऑक्टो १९७५ रोजी पहिल्या ५ RRBs आलीत.
1) मोरादाबाद (उ.प्र) — सिंडिकेट बँक पुरस्कृत
2) गोरखपूर (उ.प्र) — SBI —11—
3) भिवानी (हरियाणा) — PNB —11—
4) जयपूर (राज.) — UCO —11—
5) माल्डा (प. बंगाल) — युनायटेड बँक ऑफ इंडिया —11—

१९८७ - केळकर समिती - नवीन RRB स्थापन न करण्याची शिफारस.
सध्या गोवा व सिक्किम मध्ये RRBs नाहीत.

कार्ये / उद्दिष्ट्ये : 1) खालील व्यक्तींना स्वस्तीच्या दरात वित्तपुरवठा.
- छोटे व सिमांत शेतकरी (मध्यम व मोठे नाही)
- भूमिहीन शेतकरी
- कृषी कामगार

Scanned by CamScanner

- ग्रामीण कारागीर, लघु उद्योजक व व्यापारी, अल्प साधनसामग्री असलेल्या व्यक्ती

2) ग्रामीण जनतेला बँकिंगची सवय लावून त्यांच्याकडून अधिक बचती गोळा करणे.
3) ग्रामीण भागात उद्योजकतेचा विकास घडवून आणणे.
4) व्यापार व वाणिज्याचा विकास घडवून आणणे.
5) ग्रामीण जनतेला सावकाराच्या तावडीतून सोडविणे.
6) प्रादेशिक आर्थिक असमतोल दूर करणे.

⇒ स्थापनेपासून RRB's वर 100% कर्जपुरवठा लक्ष्य गटाला करण्याचे बंधन.
परंतू 1994 पासून नफाक्षम बनण्यासाठी 40% - गैरलक्ष्यगटाला

पुरस्कर्त्या बँकेची कार्ये:

1) RRB's च्या भागभांडवलापैकी 35% भांडवल पुरवठा करणे.
2) RRB's ना पुनर्वित्त पुरवठा करणे.
3) किमान 5 वर्षासाठी त्यांच्या कर्मचाऱ्यांना स्वखर्चाने प्रशिक्षण देणे

प्रादेशिक ग्रामीण बँकांची भांडवली रचना:

1) प्रत्येक RRB चे अधिकृत भांडवल 5 कोटी रु तर प्रसृत भांडवल (Issued Capital) 1 कोटी रु इतके असते. (प्रसृत भांडवलात केंद्र - 50% राज्य 15% व बँक - 35%)

नियंत्रण: नाबार्डचे:

नाबार्ड मार्फत - 1) धोरणे तयार केली जातात.
2) पुनर्वित्त पुरवठा केला जातो.
3) कार्याचे नियंत्रण व तपासणी केली जाते.

RRB's ची पुनर्रचना:- विविध समित्या:

1) एम.सी. भंडारी समिती - 1994-95
2) मित्रा समिती 1995
3) बसू समिती 1995-96
4) 26 ऑगस्ट 1996 पासून RRB's ना आपला व्याजदर स्वत: ठरविण्याचे अधिकार देण्यात आले.
5) थिंगालय समिती - 1996
6) व्यास समिती - 2004

Scanned by CamScanner

RRB's चे विलिनीकरण:

⇒ २००५ मध्ये ए. व्ही. सरदेसाई यांच्या अध्यक्षतेखाली 'RRBs विषयक अंतर्गत कार्यगट'

जून २००५ - अहवाल - विलिनीकरणाची शिफारस

त्यावेळी जवळजवळ १९६ RRBs कार्यरत होत्या. विलिनीकरणानंतर (जाने १८) त्यांची संख्या ५६ · सर्वाधिक उ.प्रदेशात - ७.

महाराष्ट्रात 2- ① महाराष्ट्र ग्रामीण बँक - औरंगाबाद } पुरस्कर्ती बँक Bank of Maharashtra
कार्यक्षेत्र - १६ जिल्हे
शाखा - ३२३

② विदर्भ - कोकण ग्रामीण बँक - नागपूर } Bank of India
कार्यक्षेत्र - १८ जिल्हे
शाखा - २८२

RRB's चे पुनर्भांडवलीकरण

⇒ संदर्भात - २००९ - के. सी. चक्रवर्ती · अध्यक्षतेखाली समिती.
९ % भांडवल पर्याप्तता साध्य करण्याची शिफारस.

⇒ प्रादेशिक ग्रामीण बँक (सुधारणा कायदा) २०१५
१९७६ च्या कायद्यात बदल. - ४ फेब्रु २०१६ पासून अंमलात.

नुसार ⇒ 1) अधिकृत भांडवल २००० कोटी रु. ते १ कोटी पेक्षा कमी नसेल.

२) प्रदत्त भांडवल १ कोटी--

३) इतर स्त्रोतातून भांडवल उभारणीस परवानगी (केंद्र/राज्य/पुरस्कर्ती बँक व्यतिरिक्त) मात्र केंद्र व पुरस्कर्ती बँक यांची एकत्रित भागीदारी ५१% पेक्षा जास्त.

५) पुरस्कर्त्या बँकेवरील ५ वर्षे प्रायोजकत्वाचे बंधन रद्द.

५) एका ग्रामीण बँकेच्या संचालक दुसऱ्या ग्रामीण बँकेच्या संचालक मंडळावर नेमण्यास पात्र नसेल.

6) लेखाकामाचे वर्ष - ३१ मार्चला संपेल. - (पूर्वी ३१ डिसें)

Scanned by CamScanner